Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# भटक्या जाती जमाती मधील मसणजोगी जमातीचे स्थान

**प्रकाश भागीनाथ बच्छाव**
संशोधक विद्यार्थी

**डॉ. शिवाजी अंभोरे**
विभागप्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर

भारतीय हिंदू संस्कृतीमधील जात हा वास्तवाचा एक महत्वाचा घटक आहे. भारतीय संस्कृतीत जाती व्यवस्थेने बनलेली आहे. जाती शिवाय व्यक्तीचा, समुहाचा विचार करणे सहजासहजी शक्य नाही. भारतात विविध जाती समुह पहावयास मिळतात. त्यातील भटक्या जाती-जमाती आपले लक्ष्य वेधून घेतात ते त्यांच्या जीवन पध्दतीने व त्यांच्या लोकजीवनाने. भटके जीवन भटक्या जाती-जमातीच्या वाट्याला आलेले आहे. या भटकंतीमधून त्यांच्या परंपरा समृध्द झालेल्या आहेत. त्यातून त्यांची आगळी वेगळी संस्कृती तयार झालेली आहे. उदरनिर्वाहाकरीता अगर वाट्याला आलेल्या व्यवसायानिमित्त पोट भरण्याच्या साधनांच्या शोधासाठी भटकत राहणाऱ्या लोकांना भटके म्हणतात. भटक्या जाती-जमातीचे वर्गीकरण शासनाने एनटी-ए, एनटी-बी, एनटी-सी, आणि एनटी-डी याप्रमाणे केलेले आहे. त्यात विविध जाती-जमातीचा समावेश केलेला आहे. इंग्रजीत भटक्या जाती- जमातीचा उल्लेख 'नोमॅड्स' असा केला जातो. 'नोमेड' हा शब्द 'नोमी' या ग्रीक शब्दापासून बनलेला आहे. या शब्दाचा ग्रीक अर्थ गुरे चारणे असा होतो. स्वतःचे शेत जमीन नसणे, गुरे चारणे, घर नसणे परंतु गुरांचे कळप घेऊन हे लोक चराऊ कुरणांचा शोध घेत सतत एका गावाहून दुस-या गावात जात. या सर्वांना भटके लोक म्हटले जात. याला उद्देशूनच नोमेड हा शब्द आलेला आहे.

भटक्या जाती-जमातीची संकल्पना स्पष्ट करतांना श्रीकांत मुद्दे म्हणतात,''हजारो वर्षापासून ज्या समाज रचनेने भाणि इथल्या व्यवस्थेने ज्यांना गावकुसाबाहेर ठेवले, त्यांच्या जगण्याची, त्यांच्या प्रश्नांची येथील व्यवस्थेला दखल घ्यावी वाटली नाही, त्यांचे प्रश्न येथील व्यवस्थेला महत्वाचे वाटत नाहीत, येथील व्यवस्थेच्या दडपणाखाली ज्यांच्या समोर भटकंती शिवाय पर्यायच उरत नाही आणि अखंड भटकंती करून ज्यांनी एक स्वतःची भटकी संस्कृती निर्माण केली, ज्यांच्या आयुष्यात

दुःख दारिद्र्या शिवाय काहीच नाही, ज्यांच्या जीवनात केवळ अंधार आणि अंधारच राहीला, ज्यांच्या वाट्याला केवळ अंधारमय जीवन जगणं आलं, ज्यांच्या माथी इंग्रजांनी गुन्हेगारीचा शिक्का मारला म्हणून ज्यांना गावकुसाबाहेरही स्थिर होता आले नाही, जे या देशाचे भुमीपुत्र म्हणवले जातात, परंतु त्यांच्या व्यथा, वेदनांचा येथील प्रस्थापित व्यवस्थेत विचारच केला गेला नाही. येथील व्यवस्थेने ज्यांना नागवेच ठेवले, ज्यांची झोळी आयुष्यभर रितीच राहली. इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने ज्यांना 'आम्हीही या व्यवस्थेचे घटक आहोत' अशी जाणीवच होऊ दिली नाही म्हणून आयुष्यभर त्यांच्या वाट्याला दुःख, दैन्य, दारिद्र्य आणि अंधारच आला, हे ज्यांनी भोगले ते म्हणजे विमुक्त भटके होय.''[१] श्रीकांत मुद्दे यांनी भटक्या जाती जमातीची भारतीय व्यवस्थाच येथे स्पष्ट केली आहे. भारतीय समाज व्यवस्थेने भटक्या जाती-जमातीना आपल्यात कधीच समावून घेतले नाही. त्यांना आपलं मानलं नाही. नेहमीच गावकुसाबाहेरचं जगणं त्यांच्या माथी मारलं म्हणून भटक्या जाती जमातीच्या वाट्याला भटकं जीवन आणि उपेक्षितपणाचं आले असेही येथे आपल्या लक्षात येते.

भारतीय समाजव्यवस्थेत पूर्वी भटक्या जाती जमतींना गावगाड्यात स्थान नव्हते. गावकुसाबाहेरचं हाल अपेष्टाचं जीवन जगणं त्यांच्या नशीबी होतं. गावकुसाबाहेरची हक्काची जागा त्यांना नव्हती. गावशिवारातही अस्तित्व नव्हतं. आजही त्यांच्या जीवनात म्हणावा तसा फारसा बदल झालेला नाही. मूठभर भटक्या समाजाच्या जीवनात स्थिरता आलेली आहे परंतू हजारो भटके आजही पोटासाठी भटकत आहेत. भटक्या जाती-जमातीची नेमकी संख्या किती आहे हे सांगता येत नाही. दारिद्र्य, दुःख त्यांच्या जीवनात ठाण मांडून बसलेले आहे. या बाबत डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी अत्रे यांचे मत उद्धृत केले आहे ते याप्रमाणे, 'जे फिरस्ते नियमित रहातील गावी येतात व तिथे आपला माल विकून, काम करुन अगर भिक्षा मागून कमाई करतात. अशा प्रकारे उघाडीच्या दिवसात हे अनेक गावे घेतात आणि पावसाळ्यात ते स्थानिक झाले असतील त्या गावात दिवस घालवतात. जे फिरस्ते नेमलेल्या गावे, वाई, वाडीप्रमाणे न येता वाटेल तेथे भटकातात. त्यांना आपण उपलाजी म्हणू. घिसाडी, बेलदार, वडर, कैकाडी, वंजारी, लमाण, नेमाडातील येवानी, वैदू, गोंड, मांगगारोडी, गोपाळ, कोल्हाटी, हरदास, दरवेशी, बंदरवाले मुसलमान, गारोडी, माकडवाले, कंजारी, नंदीबैल वाले, तिरमल, मसणजोगी, चित्रकथी, फासेपारधी, बहुरूपी, रायरंद, भोये, भगत, भूते,

आराधी, वाघे, मुरळ्या, हिजडे, जोगतीण, कातकडणी, हाडकांच्या माळा घालणाऱ्या नवलाया, भराडी, वासुदेव, पांगुळ, गुरुवाळ संतोष, राऊळ मेंढिंगे, कुडमुळे जोशी, सुपहलव्या, पोतराज, कानफाटे, उदासी, यघोडी, खरे-खोटे, आंधळे-पांगळे, नाथपंथी, कबीरपंथी, सन्यासी, गोसावी, फकीर, इराणी, बलुची, अफगाणी इत्यादी भटके अनेक प्रकाराचे लोक खळी मागण्यासाठी व इतर वेळी खेड्यावर फेऱ्या  घालीत असतात.''[२] डॉ. प्रल्हाद यांनी आत्रे यांच्या मताला येथे उद्धृत केलेले आहे. या वरून भटक्या जाती-जमाती त्या गावगाड्यांचा एक महत्वाचा भाग होता असे लक्षात येते. त्यांच्या शिवाय गावगाड्यातील संस्कृती पूर्णच होऊ शकत नाही. हे सर्व लोकसंस्कृतीचे उपासक आहेत. पोटाची खळगी भरण्यासाठी सतत भटकंती करीत असत. गावकुसाबाहेरचं त्यांचं जगणं गावगाड्यावर अवलंबुन आहे. भटक्या जाती जमातील भटकंतीचा शाप जरी मिळाला असाला तरी त्याला येथील व्यवस्थाच कारणीभूत आहे असेही म्हणता येते. आजही लोकांची भटकंती पूर्णपणे थांबलेली नाही, ही वास्तव येथे लक्षात घ्यावी लागते.

भटक्या जाती-जमाती मधील 'मसणजोगी' हा समाज आपली आगळी वेगळी संस्कृती जपणारा समाज महाराष्ट्रामध्ये आढळून येतो. या अर्थाने तो भारतीय संस्कृतीचा उपासक आहे. सतत लोकांच्या उपयोगी पडणारा हा समाज आपल्या स्वत:च्या आयुष्यात मात्र हाल अपेष्टांचे जीवन जगत आहे. भटक्या जाती-जमाती मध्ये येणारा मसणजोगी हा समाज एनटी-बी या प्रवर्गात समाविष्ठ केलेला आहे. सतरा नंबरला या जातीचे नाव आहे. ४० ते ४५ जमाती या प्रवर्गामध्ये येतात. त्यांना एकूण २.५ टक्के आरक्षण शासनाने दिलेली आहे. 'मसणजोगी' या जमातीमध्ये सुदगद सिद्ध, मापणजोगी या दोन प्रमुख जातीचा समावेश होतो. २००८ साली शारदाकार, शेंदकर, शादकिल, बालसंतू या उपजातीचा समावेश मसणजोगी जातीमध्ये करण्यात आला. मनुष्याच्या मृत्यूनंतर त्याचे अंतिम संस्कार करणारे लोक म्हणून मसणजोगी ओळखले जातात. अंत्यसंस्कार करण्यासाठी त्यांना दिक्षा विधी करावा लागतो. इतर लोक मात्र भटकंती करत आपले पोट भरतात. मसणजोगी लोक शीव संप्रदायाला मानणार आहेत. भगवान शंकर यांचे निवास स्थान मसणभूमीत होते म्हणून मसणजोगी शीव-भैरव ही आपली उपास्य दैवत मानतात. महादेव, वेताळ हे आपले पूर्वज असून त्यांची परंपरा पुढे चालविण्यात ते धन्यता मानतात. राजा हरिचंद्र हे डोंब्या महाराची नोकरी करून

स्मशान भूमीत प्रेताची विल्हेवाट लावीत होते. काही मसणजोगी राजा हरिचंद्राचे आम्ही वंशज आहोत असेही अभिमानाने सांगतात. स्मशान भूमीत राहून प्रेताची विल्हेवाट लावणे, मिळेल त्या बिदागीवर आपल्या पोटाची खळगी भरणे या सारखे काम मसणजोगी लोकांना करावे लागते.

मसणजोगी जाती-जमाती बदल भीमराव व्यंकय्या चव्हाण म्हणतात, स्मशानभूमीत दररोज प्रेत येत नसल्याने हे लोक भिक्षा मागून पोट भरतात. भिक्षा मागताना भगवान शंकरासारखी वेशभूषा हे लोक करतात. शंकरासारखे केस वाढवितात. डोक्यावर किरीट घालतात. किरिटावर देवदेवतांचे टाक असतात. त्यावर तुऱ्या  सारखे मोर पंख लावतात. कपाळावर लाल, पांढर गंध लावतात. तोंडावर रंग रंगोटी केली जाते. डोक्याभोवती लाल पांढर रंगाचे पटटे, देव देवताच्या टाकांची माळ, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा व हाडाची माळ, कानात मोठाली रिंग, भूतबाधा घेऊ नये म्हणून दंडात विरकंगण घातले जाते. अंगात सदरा असतो तोही ढगळ व त्यावर कोट घातला जातो. अंगावर उपरण्यासारखे लाल कापड वापरतात. अनेक प्रकाराच्या माळाही गळ्यात घातल्या जातात. त्यात कवड्याची माळ, कानाता मोठे रिंग, अंगात रंगी बेरंगी शर्ट, कपाळावर राखेच्या किंवा शेंदराच्या पटट्या ओढलेल्या असतात. खांद्यावर विशिष्ट प्रकाराची झोळी अडकवलेली असते. हातात घंटी किंवा शंख असतो. भिक्षा मागतांना घरोघरी शंख वाजविला जातो. बैलाच्या गळ्यातील घंटा ढणाढणा वाजवून हरहर महादेव म्हणत भिक्षा मागितली जाते. भिक्षा घेतल्या शिवाय हे लोक जात नाहीत. त्यांचा वेश पाहून लोक घाबरतात. मसणजोगी आपल्या दारातून लवकर जावा म्हणून ही भिक्षा वाढली जाते. हे लोक सकाळीच भिक्षा मागतात दुपारी बारानंतर ते आपल्या पालावर येतात. असा हा समाज भिक्षा मागून, प्रेताची विल्हेवाट लावून प्रेतावर उतरून टाकलेल्या अन्नावर गुजराण करतांना दिसून येतो.'[२] यावरून असे म्हणता येते की, महाराष्ट्रातील एक भटकी जमात म्हणून मसणजोगी समाजाकडे पाहीले जात. भटक्या समाजामधील सर्वात जास्त हाल अपेष्टा या जाती-जमातीना सहन कराव्या लागतात. अत्यंत हलाखिचे जीवन हे लोक जगतात. महाराष्ट्रातील खेड्या पाड्यात भटकतांना रंगबिरंगी पोषाख हे लोक करतात. जास्त करून भगवे कपडे परिधान करण्याकडे यांचा कल असतो. दाढी आणि केसाच्या जटा वाढविल्यामुळे लहान मुले आणि स्त्रिया त्यांना घाबरून घरात पळ काढतात. हे लोक गावात न राहता स्मशानभूमीत किंवा गावाच्या बाहेर राहतात. स्मशान भूमीत पक्के घर नसेल तर

पाल ठोकून ते राहतात. मराठवाड्यात औरंगाबाद, परभणी, नांदेड, चाकूर, उदगीर, सिल्लोड, लासुर, परतूर या शहराच्या आसपास स्मशान जोगी स्थाईक झालेले पहावयास मिळतात.

भिक्षा मागतांना मसणजोगी लोक आरडाओरडा करतात. कारण इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधले जावे हा हेतू त्यात असतो. त्यांचा पोशाख, हा विचित्र असतो. त्यामुळे माणसे त्यांना घाबरतात. तशी ही माणसे स्वभावाने अतिशय शांत असतात. पिढ्यानं पिढ्या भिक्षा मागणे हे त्यांच्या नशिबी आलेले आहे. एका गावात पोट भरत नसाल तर दुसऱ्या गावाला जाणे. त्यांना स्वतःच अस घर नाही. स्मशानभूमीत रखवालदार म्हणून त्यांना काम करावे लागते. भिती हा शब्दच त्यांना माहीत नसतो. त्यांना भूत प्रेत, पिश्चाच याचे त्यांना कधीच भय वाटत नाही. पोटापुरते अन्न मिळाले त्यात समाधान मानणारी ही जमात आहे. रोजचे अन्न रोज मिळविणे, त्यासाठी भटकंती करणे, भिक्षा मागणे या सारखी कामे या लोकांना करावी लागतात. अलिकडच्या काळात या समाजात शिक्षणाचे प्रमाण हळूहळू वाढत आहे परंतु त्याचे प्रमाण हे अतिशय कमी आहे. अनेक कुटुंबे स्थायिक होत आहेत परंतु भटकेपण हे कायम आहे. मसणजोगी समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या मुलांना सक्तीने आश्रमशाळेत दाखल केले पाहीजे तरच या समाजाची शैक्षणिक प्रगती होइल. त्यांचे प्रश्न समजावून घेऊन त्यांच्या प्रगतीच्या वाटा ह्या जाणून घेतल्यानंतरच या समाजाचा विकास होईल असे ही येथे म्हणता येते.

मसणजोगी जमातीमधील लोक महाराष्ट्रात सर्व जिल्हयात आढळून येतात. मुळचे हे लोक तेलंगणा मधील आहेत. तेलंगणामधुन हे लोक भटकंती करत करत महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात आलेले आहेत. महाराष्ट्रातील काही भागात हे लोक' शारदाकार' या नावाने ओळखाले जातात. महाराष्ट्रात या जमातीच्या सोळा कुळी आढळून येतात. या सोळा कुळीची नावे गंदेवार शंकर हनुमंत यांनी सांगितली ती या प्रमाणे: कडमिंचे, शेंडरे, मोरे, उबदे, लासुरे, संकोड, मामडे, टेकाडे, कापरे, शिरगीरे, बाजोड, कलल्यामोड, भिरनालोड, पत्र्योड, कोंडा बिलोड, सितारे ही कुळे मसणजोग्याची आहेत.'[४] मसणजोगी यांची भाषा ही तेलगू आहे. आजही आपल्या कुटुंबामध्ये ते ही भाषा बोलतात. मराठी आणि हिंदी भाषाही त्यांना येते. हे लोक मासांहारी असून मासांहार आणि

शाकाहार असे अन्न ग्रहण करतात. पूर्वी या समाजामध्ये जात पंचायत प्रथा होती. काळानुसार जात पंचायतीचे  प्रस्थ कमी झालेले आहे.

मसणजोगी समाजातील महाराष्ट्रात अनेक आडनावे आहेत. मामदगे, इबिते, कत्लेमोड, विभूते, शेणुरे, बाजोड, शिरगिरे, कडमिलचे, गंदेवार, शिंदे, पस्तमोड, अनारसे, माकडमोरे, संकोड, शंकूवाड, पवार, गंदोड, कोंडपिलवाड, मुकुटमोरे, शेणरोड, उंबदोड, कळमीचोड, सनकोड, सिरवालोड ही आडनावे या जमातीत आढळून येतात. या सर्व लोकांचा समावेश भटक्या जाती-जमाती एनटी-बी या प्रवर्गामध्ये  समावेश केलेला आहे. मसणजोगी जमाती मधील लोक आपली संस्कृती, परंपरा, रुढी आणि चालीरिती जपतांना दिसतात. त्यामुळे त्यांची संस्कृती ही त्यांना मसणजोगी असे नाव वेगळी ठरते. स्मशानात राहतात म्हणून त्यांना मसणजोगी असे नाव पडले आहे, असे म्हणता येते.

अंत्यविधीसाठी आलेल्या पार्थिवावर दाह संस्कार करणे, त्यासाठी लाकडे पुरविणे, सरण रचने, प्रेतावर संस्कार करणे या सारखी कामे ही लोक करतात. या कामासाठी त्यांना मृताच्या नातेवाईकांकडून अल्पशा मोबदला मिळतो. प्रेतावरील कपडे घेण्याचा अधिकार त्यांना असतो. मृताचे जुने कपडे ही ते वापरतात. त्यात त्यांना काहीच गैर वाटत नाही. स्मशानभूमीत त्यांना भितीतर अजिबात वाटत नाही. जेथे माणसांचा शेवट होता तेथ मसणजोगी बांधवाच्या जीवनाची सुरवात येते. कुणाच्या तरी मरणांवर त्याचे जीवन जगणे अवलंबून असते असेच येथे म्हणता येते. गावात कोणाचा मृत्यू झाला तर स्मशानात घंटानाद करण्याचे काम हे लोक करतात. अंत्यविधी उरकल्यावर मृतांच्या नातेवाईकाकडे भिक्षा मागतात. भटकंतीवर असलेले लोक स्मशान भूमीत निवास करतात. त्यांचे सर्व विधी स्मशानभूमीत केले जातात, लग्नही स्मशानभूमीत लावले जाते. स्मशान भूमीत प्रेत आले की घंटानाद आणि शंखनाद ही करण्याचे काम हे लोक करतात. मृत आत्म्याला शांती मिळावी म्हणून भगवान शंकराच्या नामाचा जप केला जातो. जळत्या सरणाची ते काळजी घेतात. अंत्यसंस्कार हा मनुष्याच्या जीवनातील शेवटचा संस्कार असतो. हा शेवटचा संस्कार करण्याचे काम हे लोक करतात म्हणून ते भारतीय संस्कृतीचे खऱ्या अर्थाने पाईक आहेत असे तरी म्हणता येते.

महाराष्ट्रात यवतमाळ, परभणी, जालना, नांदेड या जिल्ह्यात मसणजोगी जमाती मधील लोक स्थिरावलेले आहेत. परंतु आजही त्यांना हक्काची घरे नाहीत, शेतजमीन नाही, झोपडीवजा घरांमध्ये ते राहतात. उदरनिर्वाह करण्यासाठी भिक्षा मागणे आणि जीवन जगणे हा त्यांचा नित्य क्रम झालेला आहे. मसणजोगी भाकरीच्या शोधात आजही भटकंती करत आहे, भिक्षा मागत आहे. या बद्दल आनंद कसबे म्हणतात, ‘‘मसणजोगी समाज आपला कुटूंब काफिला घेऊन सारा देश पालथा घालतात आणि आपला संसार गाडा हाकतात. त्यांच्या सोबत त्यांची मुले ही असतात. त्यांची मुलेही भिक्षा मागतात. स्त्रिया मात्र भिक्षा मागत नाहीत. त्यांच्या मुलांचा आणि शाळेचा फारसा संबंध येत नाही. समाजात शिक्षणाचे प्रमाण हे तीन टक्के असून शासकीय नोकरीची टक्केवारी शुन्य आहे. साहजिकच हा समान विकासापासून कोसो दूर असल्याचे दिसत आहे. विशेषत: मसणजोगी समाज संघटीत नसून त्यांचा कुणीही नेता नाही.’’[५] या वरून आपल्या असे लक्षात येते की, काळाच्या ओघात तरी मसणजोगी समाजात व त्यांच्या जीवनमानात फारसा फरक पडलेला नाही. अतिशय हलाखिचे जीवन त्यांना पूर्वी पासून आज पर्यंत जगावे लागते. उन, वारा, थंडी, पाऊस याची तमा न बाळगता ते जीवन जगत आहे.

भारतीय लोकांना स्वातंत्र्य मिळून ७३ वर्ष होऊन गेलेली आहे आहे. तरी त्या लोकांना स्वातंत्र्याच्या सुविधा मिळाल्या आहेत का असा प्रश्न आपणास पडतो. स्मशानभूमीत राहून जीवंतपणी मरण यातना त्या लोकांच्या वाट्याला आलेल्या आहेत. स्मशानभूमीत राहून पोट भरता येत नाही म्हणून भटके जीवन त्यांना जगावं लागतं हे आधुनिक युगातील सत्य व वास्तव चित्र आहे. हे वास्तव चित्र बदलणं अपेक्षित आहे. या समाजातील लोकांना प्रगतीच्या दिशेला घेऊन जायचे असेल तर इतर समाज, सरकार यांनी माणूसकीच्या नात्याने या समाजाकडे लक्ष दिले पाहिजे. मसणजोगी समाजाने काळाची पाऊले ओळखून शिक्षणाची कास धरली पाहीजे तरच या समाजाची उन्नती होईल. भारत बलशाली आणि बलाढ्य व्हायचा असेल तर भटक्या जाती जमाती मधील सर्व समाजाचा विकास होणे अपेक्षित आहे, एवढेच इथे म्हणता येईल.

**संदर्भ**

१) मुद्दे श्रीकांत, 'अंधारवाटा - भटक्या विमुक्तांचे दर्शन' (संपा) प्रवर्तन पब्लिकेशन, लातूर, प्रथमावृती, २०१४, प्र. कृ. ६

२) तत्रैव- पृ.कृ. ९२

३) चव्हाण भीमराव व्यंकप्पा, 'उपलाणी', स्वाभिमान प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००९, प्र.क.३०

४) परिसरातील मुलाखती, गंदेवार शंकर हनुमंत, ता. पाथर्डी, जि. अ.नगर.

५) दैनिक महाराष्ट्र टाइम्स (लेख-आनंद कसबे) ३१ जानेवारी २०१६